अतिक्रमणे—

शासकीय पड व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एलइएन-१०९०/प्र.क्र. १७२/ज-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २८ नोव्हेंबर १९९१

वाचावे.— (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०७८/३४८३/ग-१, दिनांक २७ डिसेंबर १९७८.
(२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०७९/१४८९/ग-१, दिनांक २७ जुलै, १९७९.
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी-२७७९/२७०९/ग-१, दिनांक १८ डिसेंबर १९७९ व
(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०७९/२२९-ग-१, दिनांक १ फेब्रुवारी, १९८३.

### शासन निर्णय

वर प्रस्तावनेत क्रमांक (१) येथे नमूद केलेल्या दिनांक २७ डिसेंबर, १९७८ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय पड, गायरान व वन जमिनीवर शेतीसाठी झालेली व दिनांक ३१ मार्च, १९७८ रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतचे आदेश काढण्यात आले आहेत. दिनांक ३१ मार्च, १९७८ नंतरची अतिक्रमणे तात्काळ दूर करण्यात यावीत असे शासनाचे निदेश असतानासुद्धा सुमारे १,०८,९१५.५४ हेक्टर शासकीय पड व गायरान जमिनीवर ८४,२३० व्यक्तींनी दिनांक १ एप्रिल, १९७८ ते १४ एप्रिल, १९९० या काळामध्ये शेती प्रयोजनासाठी अतिक्रमणे केल्याचे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. (अतिक्रमणाबाबत शासनाकडे कळविलेल्या जिल्हानिहाय माहिती दर्शविणारा तक्ता सोबत परिशिष्ट "एक" येथे जोडला आहे.)

२. शासकीय पड आणि गायरान जमिनीवरील दिनांक १ एप्रिल, १९७८ ते १४ एप्रिल, १९९० या कालावधीमध्ये मागासवर्गीय आणि इतर व्यक्तींनी शेतीसाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावीत किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. समाजातील गरीब घटकांना चरितार्थाचे साधन मिळावे या उद्देशाने सहानुभूतिपूर्वक विचार करून शासकीय पड आणि गायरान जमिनीवरील दिनांक १ एप्रिल, १९७८ आणि १४ एप्रिल, १९९० या कालावधीमध्ये मागासवर्गीय आणि इतर भूमिहीन व्यक्तींची शेतीसाठी झालेली व दिनांक १४ एप्रिल, १९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या (यापुढे "महसूल संहिता" असा उल्लेख करण्यात आलेला आहे) कलम ४० च्या आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या (यापुढे "नियम" असा उल्लेख करण्यात आलेला आहे) नियम ४३ च्या तरतुदींमधील आदेशात अंशतः बदल करून (पारशल मॉडीफिकेशन) खालील शर्ती व अटींवर नियमानुकूल करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे :—

(१) दिनांक १ एप्रिल, १९७८ आणि दिनांक १४ एप्रिल १९९० या कालावधीत झालेली व दिनांक १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावीत ;

(२) अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे नित्याचे वास्तव्याचे ठिकाण (युज्वल प्लेस ऑफ रेसीडन्स) नियमानुकूल करावयाच्या जमिनीच्या ८ कि. मी. च्या परिसरात असावे ;

(३) सदर कालावधीमध्ये अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीने अतिक्रमित केलेली जमीन किमान एक वर्ष तरी कसली असली पाहिजे ;

(४) अतिक्रमण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे जास्तीत जास्त २ हेक्टर जिरायत जमीन एवढे अतिक्रमण नियमानुकूल करण्यात यावे ;

(५) अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीकडे त्यांनी धारण केलेली काही जिरायत जमीन असल्यास अशा व्यक्तींच्या बाबतीत २ हेक्टर क्षेत्र पूर्ण करण्यासाठी जेवढे क्षेत्र आवश्यक असेल तेवढेच जिरायत क्षेत्र नियमानुकूल करण्यात यावे ;

(६) अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीने अतिक्रमणाच्या संपूर्ण कालावधीतील आकारणी (असेसमेन्ट) आणि महसूल संहितेच्या कलम ५० च्या तरतुदींप्रमाणे दंड आकारलेला असल्यास तो भरणे आवश्यक राहील ;

(७) अतिक्रमण करणारी व्यक्ती जर मागासवर्गीय असेल तर जमिनीच्या आकारणीच्या ६ पटी इतकी आणि अमागासवर्गीय असेल तर आकारणीच्या २४ पटी इतकी कब्जेहक्काची रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या तरतुदीप्रमाणे भरण्यास पात्र राहील ;

(८) अतिक्रमण करणारी व्यक्ती जमिनीच्या कृषिक वापराबाबत सर्वसाधारण (ऑर्डिनरी) कृषिक आकारणी भरण्यास पात्र राहील. शिवाय, मूळ १९७१ च्या सरकारी जमिनी वाटपाबाबतच्या नियमातील नियम ४३ (१) (अ) मधील क्र. (चार), (पाच) आणि (सहा), या शर्तीही अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर लादण्यात याव्यात ;

(९) या निर्णयाप्रमाणे नियमानुकूल करण्यात यावयाची अतिक्रमणे नियम ४३(१) (अ) (चार), (पाच) आणि (सहा), यामध्ये विहित केलेल्या शर्ती तसेच नेहमीच्या शर्ती व अटींना अधीन राहतील;

(१०) या निर्णयाप्रमाणे नियमानुकूल करावयाच्या अतिक्रमणाबाबत नियम ११(५) मध्ये विहित केलेली आर्थिक मर्यादा आणि नियम १७ खाली विहित केलेली जमीन वाटपाबाबतची कार्यपद्धती शिथील करण्यात यावी; आणि

(११) जमीन प्रदानाचे आदेश आणि सनदा अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींच्या आणि त्यांच्या पत्नींच्या (अविवाहित विधवा व्यक्ती सोडून) नावाने शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एलआरडी. १०८९/१०८८/८६-ज-१, दिनांक ७ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे काढण्यात देण्यात यावेत.

३. खालील प्रकारची अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमानुकूल करण्यात येऊ नयेत :—

(अ) दिनांक १४ एप्रिल, १९९० नंतर आलेली अतिक्रमणे; आणि

(ब) इतर राज्यातील अधिवास असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सीमालगतच्या भागात शेतीसाठी अतिक्रमण केलेल्या

**टीप.**— राज्याच्या सीमेलगतच्या भागातील अतिक्रमणे करणाऱ्या व्यक्ती म्हणजे ज्यांचे नाव गेल्या विधानसभा निवडणुकीच्या यादीत नाही अशा सीमा भागातील ज्या व्यक्ती जोपर्यंत अन्य प्रकारे सिद्ध करीत नाहीत तो पर्यंत त्या व्यक्ती इतर राज्याच्या म्हणून मानण्यात याव्यात.

४. **महानगर क्षेत्रातील जमिनी.**—महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३, पोट-कलम (१) स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही महानगर प्रदेशातील कोणत्याही जमिनीवरील अतिक्रमणे राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय नुकूल करण्यात येऊ नयेत.

५. **गायरान जमीन.**— या आदेशाप्रमाणे नियमानुसार करावयाच्या गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्या ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ५१ खाली जिल्हाधिकाऱ्यांनी अशा जमिनी ग्रामपंचायतीकडून औपचारिकपणे पुनर्ग्रहण

६. **तुकडा (फ्रॅगमेन्ट्स).**— या शासन निर्णयाप्रमाणे जेवढे अतिक्रमित क्षेत्र नियमानुकूल करण्यास अनुज्ञेय आहे अतिक्रमणे तुकडे जोड आणि तुकडे बंदी अधिनियम, १९४८ च्या तरतुदींचा भंग होत असला तरीही नियमानुकूल करण्यात यावे.

७. या निर्णयाप्रमाणे अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१ मार्च, १९९२ पर्यंत पूर्ण करावयाची मुळे महसूल संहितेच्या कलम ५१ खाली जिल्हाधिकाऱ्यांना असलेले अधिकार संबंधित तहसिलदारांना प्रदान करणे आवश्यक आहे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३३०-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, मुंबई आणि उपनगर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी वगळून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी कलम ५१ खालील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत असलेले अधिकार त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित तालुक्यांच्या तहसिलदारांना खालील निर्बंध किंवा अटींना अधीन राहून प्रदान करण्यास शासन याद्वारे अनुमती देत आहे :—

"संबंधित तहसिलदारांनी वापरावयाचे अधिकार हे फक्त या शासन निर्णयाद्वारे नियमानुकूल करावयाच्या व परि मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाकडे कळविलेल्या प्रकरणापुरतेच वापरावयाचे आहेत."

(या प्रकरणी महाराष्ट्र शासन राजपत्रात जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना या शासन निर्णयासोबत "दोन" येथे जोडला आहे.)

८. या निर्णयाप्रमाणे ज्या व्यक्तींची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास पात्र ठरणार नाहीत त्यांची अतिक्रमणे तात्काळ दूर यावीत. तसेच महसूल अधिकाऱ्यांनी यापुढे अतिशय जागरूक राहून नवीन अतिक्रमणे होणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी.

९. शासकीय पड आणि गायरान जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर सोपविण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा जमिनींचा वनीकरणासाठी आणि इतर सार्वजनिक प्रयोजनांसाठी, म्हणजे गावठाण विस्तार, इंदिरा योजना, स्मशान/दफन भूमी आणि शैक्षणिक तसेच इतर संस्थांना बिनशेती प्रयोजनार्थ प्रदान करण्यासाठी जरुरीप्रमाणे उपयोग व्हावा.

१०. वर परिच्छेद १ मध्ये नमूद केल्या प्रमाणे, सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे दिनांक १ एप्रिल, १९७८ ते १४ एप्रिल, १ काळात अतिक्रमण केलेल्या व्यक्तींची संपूर्ण यादी तयार केलेली आहे अशी धारणा आहे. यास्तव, त्या यादीमध्ये समाविष्ट व्यक्तींच्या बाबतीतच या निर्णयाप्रमाणे अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावीत असे शासनाचे निदेश आहेत. वर परिच्छेद नमूद केल्या प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या यादीच्या बाहेर एखाद्या व्यक्तीने या निर्णयाप्रमाणे पात्रतेचा हक्क त्याबाबत जमिनीच्या वहिवाटीबद्दल ज्या प्रमाणे चौकशी करण्यात येते त्याच पद्धतीने उप विभागीय अधिकाऱ्यांनी चौकशी करावी अशी व्यक्ती अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र आढळल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे त्याचे प्रकरण आदेशाकरिता पाठविण्यात जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता दिल्यानंतरच अशा व्यक्तींचा या निर्णयातील आदेशाप्रमाणे अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र घेऊन त्यांच्या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात यावी.

११. शासनाच्या या आदेशाची अंमलबजावणी एक समयबद्ध कार्यक्रम आखून दिनांक ३१ मार्च, १९९२ पर्यंत पूर्ण करा असेही शासनाचे आदेश आहेत. यास्तव, विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांना असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी निश्चित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व तहसिलदारांना योग्य अशा अतिरिक्त सूचना द्याव्यात. शिवाय विभागीय आयुक्त/जि यांनी प्रत्येक महिन्यात होणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीच्या वेळी या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा तसेच ते ज्या ज्या वेळी जिल्ह्यात दौरे करतील त्या त्या वेळी या निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी होते किंवा कसे याची त्यांनी

23

१२. भूमि अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना या आदेशाद्वारे शासन पुढे असेही निदेश देत आहे की, त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी जमिनीचे सीमांकन करणे, जमिनीची आकारणी निश्चित करणे, नकाशा तयार करणे, क्षेत्र ठरविणे, इत्यादी बाबींमध्ये महसूल अधिकाऱ्यांना त्यांना ते सहकार्य देऊन त्यांना मदत करावी, जेणेकरून जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांना शीघ्रतेने हाताळता येतील आणि जी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास पात्र ठरतील त्यांना जमीन प्रदानाचे आदेश/सनदा देणे महसूल अधिकाऱ्यांना शक्य होईल.

१३. या आदेशाप्रमाणे नियमानुकूल करावयाच्या प्रकरणांबाबत दिनांक २७ डिसेंबर १९७८ च्या शासन निर्णयाअन्वये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात यावी व त्याप्रमाणे विहित केलेल्या विविध नमुन्यांत माहिती संकलित करून ती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी/संबंधित अधिकाऱ्यांनी ठेवावी. त्याचप्रमाणे सदर दिनांक २७ डिसेंबर, १९७८ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये दिलेल्या सूचनांमध्ये आवश्यक ते फेरफार करून त्या निर्णयाप्रमाणे नियमानुकूल करावयाची प्रकरणे हाताळण्यात यावीत (तात्काळ संदर्भासाठी दिनांक २७ डिसेंबर, १९७८ च्या शासन निर्णयाची व त्याच्या सहपत्रांची प्रत परिशिष्ट "तीन" येथे जोडली आहे.)

१४. सदर शासन निर्णय, ग्रामविकास विभागाच्या आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-८६०/९१/व्यय-९, दिनांक २२ नोव्हेंबर, १९९१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. गो. वर्तक,
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रत

(१) सर्व विभागीय आयुक्त,
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
(३) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(४) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(५) सर्व जिल्हाधिकारी,
(६) उप संचालक, भूमि अभिलेख, नागपूर, औरंगाबाद, पुणे आणि मुंबई,
(७) सर्व उप विभागीय अधिकारी;
(८) सर्व विभागीय वन अधिकारी आणि उप विभागीय वन अधिकारी,
(९) सर्व तहसिलदार,
(१०) सर्व जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख,
(११) मुख्य संचालक, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
(१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
(१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
(१४) ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१५) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१६) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१७) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई,
(१८) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१९) इतर सर्व मंत्रालयीन विभाग,
(२०) राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
(२१) मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
(२२) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
(२३) सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक,
(२४) महसूल विभागातील सर्व सहसचिव/उप सचिव व नियंत्रण अधिकारी,
(२५) ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग,
(२६) इतर सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग,
(२७) ज-१ कार्यासन, महसूल व वन विभाग (निवड नस्ती).

(२५)

## परिशिष्ट एक

(शा. नि. म. व. व. वि. क्रमांक एलइएन १०९०/प्र. क्र. १७२/ज-१ दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ चे सहपत्र)

दिनांक १ एप्रिल १९७८ पासून शेतीसाठी शासकीय पड जमीन व गायरानं जमिनीवर झालेली व

दिनांक १४ एप्रिल, १९९० रोजी अस्तित्वात असलेल्या अतिक्रमणांबाबतचा तपशील

| जिल्ह्याचे नाव | मागासवर्गीय व्यक्ती | इतर व्यक्ती | एकूण व्यक्ती | अतिक्रमणाखालील पड जमिनी (क्षेत्र) हेक्टर आर | अतिक्रमणाखालील गायरान जमीन (क्षेत्र) हेक्टर आर | अतिक्रमणाखालील एकूण क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **कोकण विभाग** | | | | | | |
| ) मुंबई | ... | ... | ... | .... | .... | .... |
| ) मुंबई उपनगर जिल्हा | ... | ... | .... | .... | .... | .... |
| ) ठाणे | ११०१ | १२२० | २३२१ | ८००.३७ | २८८.१८ | १०८८.५५ |
| ) रायगड | ९० | ४०९ | ४९९ | ३०५.०९ | ५०.६८ | ३५५.७७ |
| ) रत्नागिरी | ... | ५ | ५ | ०.८० | .... | ०.८० |
| ) सिंधुदुर्ग | ३४ | ३९२ | ४२६ | ५९६.६२ | .... | ५९६.६२ |
| एकूण | १२२५ | २०२६ | ३२५१ | १७०२.८८ | ३३८.८६ | २०४१.७४ |
| **नाशिक विभाग** | | | | | | |
| ) नाशिक | १११ | ७५ | १८६ | १८७.८२ | १०९.७३ | २९७.५५ |
| ) धुळे | २०६९ | ६१३ | २६८२ | २९००.८० | २४७७.३१ | ५३७७.११ |
| ) जळगांव | १०७६ | ७१५ | १७९१ | ४५५.८६ | १५४५.५८ | २००१.४४ |
| ) अहमदनगर | ३२४ | २४९ | ५७३ | ५१७.२२ | ४०६.६९ | ९२३.९१ |
| एकूण | ३५८० | १६५२ | ५२३२ | ४०२१.३० | ४५३९.३१ | ८५६०.६१ |
| **पुणे विभाग** | | | | | | |
| ) पुणे | ६९ | ३७६ | ४४५ | १६८.७२ | ५५.४७ | २२०.१९ |
| ) सोलापूर | ५१ | ४४ | ९५ | ६८.४९ | ७४.७७ | १४३.२६ |
| ) सातारा | ७१ | ४४१ | ५१२ | ६९४.२८ | २.९६ | ६९७.२४ |
| ) सांगली | ... | १३ | १३ | .... | ८.३८ | ८.३८ |
| ) कोल्हापूर | १२ | १६१ | १७३ | ९.१२ | १४.६३ | २३.७५ |
| एकूण | २०३ | १०३९ | १२४२ | ९३२.६१ | १५६.२१ | १०८८.८२ |
| **नागपूर विभाग** | | | | | | |
| नागपूर | ३११ | १९२ | ५०३ | ३४०.५२ | १९६.९२ | ५३७.४४ |
| वर्धा | ३१५ | ५१४ | ८२९ | ४०८.४४ | २४६.३३ | ६५४.७७ |
| चंद्रपूर | १११११९ | ९१८७ | २०३०६ | १८१५०.०० | २६३३९.०८ | ४४४८९.०८ |
| गडचिरोली | ३६९८ | ३०३६ | ६७३४ | ३२९५.६७ | २११३.२५ | ५४०८.९२ |
| भंडारा | ४७२९ | ७९३८ | १२६६७ | २३२३.०६ | ३१८१.२७ | ५५०४.३३ |
| एकूण | २०१७२ | २०८६७ | ४१०३९ | २४९१७.६९ | ३२०७६.८५ | ५६९९४.५४ |
| **अमरावती विभाग** | | | | | | |
| अमरावती | १०२८ | १२० | ११४८ | .... | १६१४.६८ | १६१४.९८ |
| अकोला | १६४३ | १२९ | १७७२ | ११३.८१ | १६०७.४९ | १०६१.३० |
| यवतमाळ | १३५० | ३६८ | १७१८ | ९१.८१ | २५१७.४२ | २६०९.२३ |
| बुलढाणा | ४३२६ | ५६४ | ४८९० | ५१२.०९ | ४८३०.४६ | ५३४२.५५ |
| एकूण | ८३४७ | ११८१ | ९५२८ | ७५७.७१ | १०५७०.०५ | ११३२७.७६ |

परिशिष्ट एक—चालू

| जिल्ह्याचे नाव | मागासवर्गीय व्यक्ती | इतर व्यक्ती | एकूण व्यक्ती | अतिक्रमणाखालील पड जमिनी (क्षेत्र) हेक्टर आर | अतिक्रमणाखालील गायरान जमीन (क्षेत्र) हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **औरंगाबाद विभाग** | | | | | |
| (२५) औरंगाबाद .. | ३३२१ | १०३७ | ४३५८ | २६.३७ | ८५३३.५५ |
| (२६) बीड .. | १९३२ | १०६ | २०३८ | ... | २८०५.७८ |
| (२७) नांदेड .. | ७५५१ | २१२५ | ९६७६ | .... | १२९८९.०८ |
| (२८) परभणी .. | ३८८९ | ४३८ | ३९२७ | .... | ८६०१.५६ |
| (२९) उस्मानाबाद .. | ९५ | १८ | ११३ | १.१७ | १११.१८ |
| (३०) जालना .. | २१०७ | ०२२६ | २३३३ | .... | २६५८.५० |
| (३१) लातुर .. | १२५७ | १३६ | १३९३ | .... | १५७५.०० |
| एकूण .. | १९८५२ | ४०८६ | २३९३८ | २७.५४ | २८८७८.५३ |
| अंतिम एकूण .. | ५३३७९ | ३०८५१ | ८४२३० | ३३३५९.७३ | ७६५५५.८१ |

## परिशिष्ट दोन

[शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एलइएन–१०९०/प्र.क्र. १७२/ज–१, दिनांक २८-११-९१ चे सहपत्र]

[To be Published by the Collector in the *Maharashtra Government Gazette*-Extraordinary]

### *NOTIFICATION*

Office of the Collector of

Dated the

HARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. .—In exercise of the powers conferred by Section 330-A of the harashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) (hereinafter referred to as " the said Code "), I, Colle-r of hereby with the approval of the State Government, direct that with effect from the e of publication of this notification in the *Official Gazette*, the powers of the Collector regarding regularisation encroachments conferred by Section 51 of the said Code shall be exercisable also by a Tahsildar within the limits his jurisdiction, in the district, subject to the condition that the exercise of such powers by a Tahsildar ll be restricted to the cases of encroachments to be dealt within accordance with Government Resolution, venue and Forests Department, No. LEN-1090/CR-172/J-1, dated the 28th November 1991.

Collector of...........